**नियमित दिवाणी दावा क्र. १२३/२०१२**
**सुरेश विरुध्द प्रभाकर**
**निशाणी क्र. ५९ पुढे सुरु.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी शपथेवर सुरू.**
**वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस बी जाधव**

६. मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्षशपथपत्र दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. आता मला दस्त यादी नि.क्र.३ सह दाखल जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सातारा व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांना मी दि.१५.०४.२०११ रोजी कायदेशीर नोटीस पाठविलेली होती आता मला त्या नोटीसीची स्थळ प्रत दाखविणेत आली. त्यावर माझी मुळ सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. ती **नि.क्र.६०** वर आहे. त्याबाबतच्या पोच पावत्या **नि. ६१** व **नि. ६२** वर आहेत. सहायक निबंधक सहकारी संस्था, सातारा येथून माझे विधिज्ञ श्री. राजेंद घोरपडे यांना दि.०२.०४.२०११ रोजी पत्र प्राप्त झाले होते आता मला ते मुळ पत्र दाखविणेत आले. त्यानुसार प्रकरण जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सातारा याचेकडून पाठविणेचे कळविणेत आले होते.

सरतपास पूर्ण.
**उलटतपास प्रतीवादींतर्फे विधिज्ञ श्री. बी आर भोसले –**
प्रकरण उलटतपासाकरीता तहकूब.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

वाई.
दि.१९.१२.२०२४

*स्वाक्षरी/-*

(आर.एम. भेंडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
वाई, जिल्हा सातारा.